

# ती विव्हळत मदतीची हाक देत होती, ते पाषाण हृदयी मजा पाहत होते

## मेळघाटातील घटनेमुळे पुरोगामी महाराष्ट्र हादरला | पोलीस पाटलासह चौघांना अटक | वृध्द महिलेची धिंड काढल्याचे प्रकरण

**महासागर प्रतिनिधी**

***चुरणी,( दि.18 )-पहाटे चार वाजता शौचासाठी घराबाहेर निघालेल्या 77 वर्षीय आदिवासी वृद्धेवर काही गावकऱ्यांनी जादू टोण्याचा आड घेत तिला दोरखंडाने बांधून मारहाण करण्यात आली. गरम लोखंडी सळाखीचे चटके दिले, मिरचीचे धुनी दिली, तोंडाला काळे फासले गेले, माणसाचे आणि कुत्र्याचे मूत्र पाजले, एवढ्यावरही हा अघोरी प्रकार थांबला नाही. त्या वृद्धेला डोक्यावर गाठोडे घेऊन मारत गावभर दिंड काढल्या गेली वेदनेने ती विव्हळत मदतीची हाक देत होती, मात्र पाषाण हृदयी तिची गावातून धिंड काढत होते. चिखलदरात तालुक्याच्या रेट्याखेडा येथे 30 डिसेंबर रोजी घडलेल्या या संताप जनक घटनेप्रकरणी चिखलदरा पोलीसांनी गावातील पोलीस पाटलासह चौघांना अटक करण्यात आली.***

मुख्य आरोपी माजी सरपंच तथा पोलीस पाटील बाबू झापू जामुनकर (वय 45), सायबु भुऱ्या चतुर (वय 32), रामजी भूऱ्या चतुर (वय 42), साबुलाल तुंबा चतुर (वय 32, सर्व रा.रेट्याखेडा) असे अटक करण्यात आलेल्या आरोपींचे नावे आहे. पोलिसांनी याप्रकरणी पोलीस पाटलाच्या पत्नीलासुध्दा ताब्यात घेतले आहे. ही वृध्दा काळी जादु करत असल्याचा संशय आरोपींना खूप दिवसापासून होता. ही वृध्दा मध्यरात्री उठून सायबु चतूर याच्या घराजवळ अघोरी पूजा करणार असल्याचा संशय या गावकऱ्यांना होता. या संशयाच्या आधारे आरोपी या वृध्देचा पाळतीवर होते. 30 डिसेंबर रोजी पहाटे चार वाजता ही वृध्दा शौचासाठी घराबाहेर पडताच शेजारी राहणाऱ्या सायबु चतुर व त्याच्या पत्नीने पकडून ठेवले, त्यानंतर पोलीस पाटील बाबू जामुनकर याला तेथे बोलावले. ही वृध्दा आमच्या घराच्या बाजूला जादूटोणा करीत असल्याचा आरोप त्यांनी केला. बाबू जामुनकर याने लाकडी काठीने मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यानंतर सायबु चतुर, साबुलाल चतुर ,रामजी चतुर व इतरही लोकांनी लाथा बुक्क्या हाताने मारहाण केल्याचे तक्रारीत नमूद आहे. 5 जानेवारीला बाहेरगावाहून आलेल्या वृध्देच्या मुलाने व सुनीने चिखलदरा पोलिसात तक्रार दिली. तक्रारीनुसार भारतीय न्याय संहितेच्या 118(1),352,351 (2),351(3),3/5 अन्वये गुन्हे दाखल केले. त्यात केवळ मारहाण आणि चटके शिवीगाळ आदीचा उल्लेख आहे.

### अंधश्रध्दा निर्मुलनाची कलम वाढ होणार



महिला व तिचे कुटुंबीय शुक्रवारी माझ्याकडे आले. प्रकरण अतिशय गंभीर आहे. पोलिस तपास सुरू असला तरी, माझ्याकडील तक्रारीत नमूद मुद्द्यांची, आरोपांच्या अनुषंगाने अधिक चौकशी केली जाईल. अंधश्रद्धा निर्मूलन कायद्यान्वयेही कलमवाढ केली जाऊ शकते.

**सौरभ कटियार, जिल्हाधिकारी**

### चुक शोधली जाईल-एसपी



5 जानेवारी रोजी चिखलदरा पोलीस स्टेशन ला पहिली तक्रार ही चोरीसाठी वृध्देला मारहाण झाल्याची आली होती. परंतू जेव्हा पिडीत मला भेटायला आली तेव्हा, या घटनेचे स्वरुप वेगळेच होते. 5 जानेवारी रोजी या प्रकारची तक्रार का देण्यात आली, यामध्ये पोलिसांची चुक किती झाली हे तपासण्यात येईल. घडलेली घटना अत्यंत घृणास्पद असून याप्रकरणी कुणालाच माफी केली जाणार नाही. पोलिसांची चूक झाली असेल तर नक्कीच कारवाई होईल. तक्रारदार आणि आरोपी पोलीस पाटील यांचा शेतीचा काहीतरी वाद सुरु आहे, त्याच्याशी निगडीत काही प्रकार असेल तर तसाही तपास केल्या जाईल. अश्या घटना आपल्या समोर घडत असेल तर त्याला विरोध करा, अन्यथा पोलिसांना सूचना द्या! झालेली घटना अत्यंत निंदणीय व अक्षम्य आहे. यात कुणालाही सोडले जाणार नाही.

**विशाल आनंद, पोलीस अधिक्षक, अमरावती.**

### अखवे गाव बघत होते

ही घटना होत असताना अखवे गाव बघत होते. परंतु कोणीच आडवे आले नाही. या अघोरी प्रकाराने मेळघाटातील अंधश्रद्धा केव्हा दूर होणार हा प्रश्न अजूनही अनुत्तरीत आहे. पुरोगामी महाराष्टात मेळघाट आजही अंधश्रध्देत गुरफटलेला आहे. येथे भुमका, पडीयालची आजही चालती आहे. दुसरीकडे राज्यात अंधश्रध्दा निर्मुलन कायदा तयार झालेला असताना त्याची प्रभावी अमलबजावणी मेळघाटमध्ये होताना दिसत नाही.

# चंद्रशेखर बावनकुळे अमरावतीचे नवे पालकमंत्री

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.18 )-** अमरावतीचे नवे पालकमंत्री म्हणून चंद्रशेखर बावनकुळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. बहुप्रतीक्षेनंतर अखेर जिल्हानिहाय पालकमंत्र्यांची यादी शनिवारी (दि.18) जाहीर करण्यात आली. यापूर्वी जिल्ह्याचे पालकत्व चंद्रकांत पाटील यांच्याकडे होते.

त्यामुळे पुन्हा एकदा त्यांच्या नावाची वर्णी लागेल अशी चर्चा होती. मात्र त्याचर्चेला आता पूर्णविराम मिळाला असून अखेर चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आला आहे. चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभा निवडणुकीच्या



काळात जिल्ह्यामध्ये अनेक दौरे केले. अमरावतीसोबत त्यांचा जवळचा संबंध आहे.

दरम्यान आता पालकमंत्री पदाच्या घोषणेनंतर 24 जानेवारीला जिल्हानियोजनची बैठक होण्याची शक्यता आहे. आता पर्यंत जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदाची घोषणा न झाल्याने अनेक विकास कामे रखडली होती. तसेच 26 जानेवारीला झेंडावंदन कुणाच्या हस्ते होणार असा प्रश्न उपस्थित झाला होता. दरम्यान आता चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नावाची घोषणा झाल्यामुळे त्यांच्याच नेतृत्वात 26 जानेवारीचे मुख्य ध्वजारोहण होईल हे निश्चित झाले आहे. दरम्यान पालकमंत्री पद मिळाल्यामुळे जिल्ह्यातील अनेक समस्या व विकासकामे मार्गी लागतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# हकिम आयुर्वेदिक फॅक्टरीत आढळला महिलेचा मृतदेह

### एमआयडीसीमधील घटना

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.18 )** - राजापेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीत एमआयडीसी स्थित हकिम आयुर्वेदिक फॅक्टरीत एका 75 वर्षीय महिलेचा मृतदेह कुजलेल्या अवस्थेत आढळून आल्याने खळबळ उडाली. इजुमुद्दीन अकबर अली सैफी (75, रा. अंबापेठ, अमरावती) यांनी या घटनेची माहिती 17 जानेवारी रोजी राजापेठ पोलिसांना दिली. त्यानुसार पोलिसांनी आकस्मिक मृत्युची नोंद केली आहे.

इजुमुद्दीन अकबर अली यांची साळी ही परीचयातील महिलेच्या पतीला फोन करीत होती. परंतू ते उचलत नव्हते. त्यामुळे कोणालातरी पाठवून विचारपुस करा, असे इजुमुद्दीन यांच्या साळीने सांगितले होते. त्यानुसार इजुमुद्दीन अकबर अली यांनी दुकानात काम करणारे प्रभाकर बोरकर यांना एमआयडीसीतील हकिम आयुर्वेदिक फॅक्टरीत पाठविले.

त्यावेळी त्यांना माहिती पडले की, खोलीचा लाईट बंद आहे आणि आतुन दुर्गंधी येत आहे. या माहितीवरून इजुमुद्दीन यांनी फॅक्टरीत जाऊन पाहिले आणि खोलीचे दार तोडले. त्यावेळी आतमध्ये महिलेचा मृतदेह कुजलेल्या व किडे पडलेल्या अवस्थेत दिसून आला. त्यामुळे इजुमुद्दीन यांनी या घटनेची माहिती राजापेठ पोलिसांना दिली. त्यानुसार पोलिसांनी नोंद घेऊन तपास सुरु केला आहे.

# एलसीबीने त्या नराधमाला केली अटक

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.18 )** - स्थानिक येवदा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एका गावात घरासमोर खेळत असलेल्या तीन वर्षीय चिमुकलीवर 65 वर्षीय वृद्धाने अत्याचार केला. त्याला स्थानिक गुन्हे शाखेने गुरुवारी सायंकाळी अटक केली.

पोलिस सूत्रांनुसार, प्रकाश (65) या आरोपी वृद्धाने घरापुढे खेळत असलेल्या चिमुकलीला पैसे व चॉकलेटचे आमिष देऊन आपल्या घरी नेले आणि तिच्यावर अत्याचार केला. मुलगी बराच वेळ घराबाहेर आहे, ही जाणीव होताच तिच्या आईने बाहेर डोकावले. मात्र, ती घरापुढे खेळताना दिसत नसल्याने तिचा शोध घेण्यासाठी ती गावात फिरली. अशातच गावातीलच एका महिलेने प्रकाश याने तिला सोबत नेल्याची माहिती दिली. आईने आरोपीच्या घरी जाऊन पाहिले असता, त्या मुलीचे कपडे रक्तस्त्रावामुळे लाल झाले होते आणि प्रकाशच्या अंगाला रक्त होते. दरम्यान नागरिकांनी त्याला घेराव घातला. मात्र त्याने तेथून पळ काढला. त्यामुळे पुढे पोलिस ठाण्यातदेखील मोठा जमाव एकत्र झाला. प्रकाशचे कृत्य पाहून हादरलेल्या चिमुकलीच्या आईने आरडाओरड केल्यामुळे नागरिक गोळा झाले. मात्र, त्याच वेळी आरोपी तेथून निसटला आणि शिवारात जाऊन लपला. त्यानंतर ठाणेदार राहुल देशमुख यांनी घटनास्थळाच्या पंचनाम्यानंतर आरोपीच्या शोधासाठी चमू रवाना केली. आरोपी घटनास्थरावरून फरार झाला होता. त्याला शोधण्याकरिता अमरावती येथील एलसीबी चमूदेखील सक्रिय झाली. एलसीबी पथकाने त्याला वरूड कुलट शिवारातून ताब्यात घेतले. मुलीने घडलेली हकीगत आपल्या आईला सांगितली तेव्हा तिच्यासमवेत आई-वडिलांनी येवदा पोलीस ठाणे गाठले. या खळबळजनक घटनेमुळे येवदा पोलिस ठाण्यापुढेही नागरिकांनी गर्दी केली होती.

# सातेगावच्या पदच्युत महिला सरपंच पुन्हा पदारुढ

### आयुक्तांच्या आदेशाला ग्रामविकास मंत्र्याकडून स्थगिती

**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगांव सुर्जी( दि.18 )-** तालुक्यातील सातेगाव येथील सरपंचा छाया राजेंद्र वानखडे यांचेवर पदाचा दुरुपयोग तसेच ग्रामपंचायत सातेगाव ग्रामसभेचा अपमान व शासनाची दिशाभुल करुन गरजू लाभार्थ्यांची नावे घरकुलाची यादीत घोळ करत कर्तव्यात कसूर केल्याचे सांगत दि.15 डिसेंबर रोजी विभागीय आयुक्तांनी त्याना पायउतार केले होते. परंतू सरपंचानी आयूक्तांच्या आदेशाला आव्हान देत आदेशा विरुद्ध स्थगिती आणल्यामुळे त्या पून्हा सातेगावच्या सरपंच पदी आरुढ झाल्या. आज (दि.17) ला धुरा सांभाळली.

सातेगाव हे तालूक्यातील मोठी ग्रामपंचायत असून, या ना त्या कारणाने ती नेहमीच वादात असते. ग्रामपंचायतमध्ये घरकुल वाटपात घोळ झाल्याचा आरोपानंतर तक्रारकर्त्यांनी सरंपचाविरोधात विभागीय आयूक्ताकडे दाद मागीतली होती. त्यावर दि. 16 डिसेबर ला आयुक्तांनी सरपंच छाया राजेंद्र वानखडे यांनी पदाचा दुरुपयोग केल्याच्या आरोपावरुन त्यांना पदच्युत केले होते. परंतू छाया वानखडे यांनी आयुक्तांच्या आदेशाला ग्रामविकास मंत्री यांच्या न्यायालयात आव्हान दिल्यानंतर महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनीयम कलम 39(3) नुसार आयुक्ताच्या आदेशाला पुढील सुनावणीपर्यंत तात्पुरती स्थगिती दिल्याने काल (दि.17) ला सरपंच छाया वानखडे या सातेगाव ग्रामपंचायतमध्ये पुन्हा सरपंचपदी विराजमान झाल्या. यावेळी ग्रामसेवक वाघ, विजय काळे, विठ्ठल ढोले, उपसरपंच पुरुषोत्तम काळे, सनी शेळके, अतुल काळे,



संजय गावंडे, बाळाभाऊ गावंडे, राजेंद्र वानखडे, भानुदास वानखडे, दिलीप सावरकर इत्यादींच्या व ग्रामस्थांच्या उपस्थितीत त्यांनी पदभार स्विकारला. यावेळी तक्रारकर्त्याने दाखल केली तक्रार ही आकसापोटी केली असल्याचे ग्रामपंचायतचे सरपंच छाया वानखडे यांनी केली आहे.

# अल्पवयी युवकाने केला अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर, ( दि.18 )-** दर्यापूर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील गोळेगाव येथे एका आठ वर्षीय अल्पवयीन मुलीवर 14 वर्षीय अल्पवयीनाने अत्याचार केल्याची खळबळजनक घटना शनिवारी दुपारच्या सुमारास घडली आहे. याप्रकरणी आईच्या तक्रारीवरून सायंकाळी उशीरा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घटनेच्या वेळी मुलीचे आई वडील मजुरीसाठी शेतशिवारात गेले होते. तर अल्पवयीन मुलगी घरी होती. दरम्यान शेजारीच राहणाऱ्या अल्पवयीन युवकाने खेळण्यासाठी बोलावले व आपल्या घरात नेऊन अमानुषपणे अत्याचार केला. दुपारी सासरे घरी आले असता घाबरलेली अल्पवयीन नातीला रक्तस्त्राव होत असल्याचे दिसून आले. याप्रकरणी तातडीने आईने दर्यापूर पोलीस स्टेशन गाठून तक्रार दाखल केली. तक्रारीवरून 14 वर्षीय अल्पवयीन युवकावर विविध कलमांसह गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# नंबर नसलेल्या चार दुचाकी पकडल्या

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 18 ) -** शहरात नंबर नसलेली वाहने चालवण्याची क्रेझ वाढत आहे. त्यामुळे पोलिसांनी अशा वाहनधारकांवर कारवाई करण्यास सुरूवात केली आहे. शुक्रवारी राजापेठ पोलिसांनी नंबरप्लेट नसलेल्या चार वाहनांवर कारवाई केली. या कालावधीत सुमारे चार वाहने जप्त करण्यात आली आहेत. अशा कारवाया आता अव्याहतपणे सुरू राहणार आहे.

पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी नंबर प्लेट नसलेल्या रस्त्यावर धावणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्याचे कडक आदेश दिले आहेत. तसेच वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावी, अशा सूचनाही वाहतूक पोलिसांना देण्यात आल्या आहेत, कारण हे लोक सर्वसामान्यांसाठी केव्हाही धोकादायक ठरू शकतात. त्यामुळे त्यांच्यावर वेळीच नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. शहरातील रस्त्यांवर लाखो वाहने धावत आहेत, हे विशेष. नपंबरप्लेट नसलेली अनेक वाहने धावत असून, अशा वाहनांचा वापर करून कोणतीही व्यक्ती गुन्हा करू शकते अथवा इतर वाहनांची नंबरप्लेट लावून फिरत असलेली अनेक वाहने आहेत. अशी वाहने चोरीची असू शकतात. शिवाय अशा वाहनांचा वापर करून गुन्हे करणारे गुन्हेगार पोलिसांसाठी डोकेदुखी ठरू शकतात. त्यामुळे या वाहनांवर नियंत्रण ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या सूचनांनंतर सर्व पोलिस ठाण्याचे प्रभारी सक्रिय झाले आहेत. ते आपापल्या भागात नंबरप्लेट नसलेल्या वाहनांवर कारवाई करणार असून ही कारवाई सतत सुरू ठेवण्यात येणार आहे. सध्या त्याची सुरुवात शुक्रवारपासून राजापेठ पोलिसांनी केली आहे.

# क्रीडा स्पर्धेसाठी आलेल्या विद्यार्थ्यांना फरशीवर निजविले

### मन्ना दारसिंबे यांनी दिले गटविकास अधिकाऱ्यांना पत्र



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.18 )-** तालुका स्तरिय क्रिडा स्पर्धा जि.प.हायस्कूल येथे आयोजित करण्यात आले होते. यासाठी आलेल्या आदिवासी लहान चिमुकल्यांना एवढ्या कडाक्याच्या थंडीत रात्री फरशीवर चटई टाकून झोपविल्याचा प्रकार उघडकीस आला. या प्रकारामूळे पुन्हा एकदा तालुक्यातील शिक्षण विभागाचा गलथान कारभार चव्हाट्यावर आला.

जि.प.प्राथमिक शालेय क्रिडा स्पर्धा तालुका स्तरावर घेण्यात आल्या असताना रात्रीच्या वेळी विद्यार्थ्यांना थांबविण्याबाबत कुठले आदेश आहेत काय? असा प्रश्न सामाजिक संस्थेच्या कार्यकर्त्या नी केला आहे. जर याबाबत आदेश असतील तर ते सार्वजनिक करण्यात यावे. तसेच जर विद्यार्थ्यांना मुक्कामी बोलावले असल्यास त्यांची व्यवस्था का करण्यात आली नाही. विध्यार्त्याकडून घरून ब्लँकेट बोलावले हे त्यांनी ओढलेल्या ब्लँकेट वरून स्पष्ट दिसून येत होते.

अश्या परिस्थिती एखाद्या विद्यार्थ्याला काही झाल्यास याला जबाबदार कोण असा सवालही सामाजिक कार्यकर्त्यांकडून करण्यात आला आहे. विशेष म्हणजे ज्या शिक्षकांनी विद्यार्थांना क्रिडा स्पर्धेसाठी आणले ते शिक्षक मस्त आपल्या घरी जाऊन झोपले होते. तर चिमुकल्यांना जि.प. हायस्कूल च्या चौकीदाराच्या भरवशावर ठेवले. रात्रीला गटशिक्षणाधिकारी यांनी त्या ठिकाणी भेट दिल्यावर चर्चेला उधाण आले, तेव्हा हे पितळ उघडे पडले. नाहीतर 'मेरी भी चूप और तेरी भी चूप' असा प्रकार सुरु होता.

हा कार्यक्रम पूर्वनियोजित होता. जे मुले मुक्कामी होते, त्यांच्या पालकांकडून संमती घेतली होती काय?. शासनाच्या शाळेत थांबण्याबाबत पत्र अथवा राजपत्र आहे काय? असे अनेक कोणी शासनाने स्पष्ट कराव्या, या आशयाचे पत्र आम्ही शासनाला दिले आहे. या विदयार्थ्यांना काही झाल्यास संबधित घटनेची जबाबदारी अधिकारी व शिक्षकांवर निश्चित करावी.

**मन्ना दारसींबे, अध्यक्ष महाराष्ट्र जनक्रांती सेना.**

# येवद्यात अभूतपूर्व बंद

### चिमुकलीवर लैंगिक अत्याचार प्रकरण

**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर,( दि.18 )-** तालुक्यातील येवदा पोलिस स्टेशन हद्दीत तीन वर्षीय बालिकेवरील अमानुष अत्याचाराच्या निषेधार्थ येवदा व्यापारी संघ व विविध राजकीय पक्षांनी शनिवारी (ता.18) पुकारलेल्या बंदला नागरिक आणि व्यापाऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या घटनेचा निषेधासाठी येवदा शहरातील सर्व व्यापाऱ्यांनी आपली दुकाने बंद ठेवत सहकार्य केले, तर नागरिकांनी शांततापूर्ण पद्धतीने आपला रोष व्यक्त केला. व्यापारी संघाच्या आवाहनाला प्रतिसाद देत येवद्यातील सर्व व्यापार, दुकाने, हॉटेल्स



आणि छोटे व्यवसाय संपूर्ण दिवस बंद होते. बाजारपेठ संपूर्णपणे ओस पडली होती, आणि शहरात शुकशुकाट होता. नागरिकांनीही घराबाहेर न पडता या बंदला पाठिंबा दिला. बंद यशस्वी करण्यासाठी सामाजिक व राजकीय संघटनांनी पुढकार घेतला होता. त्यांनी या घटनेचा तीव्र निषेध करत प्रशासनाकडे दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली.

बंद दरम्यान कोणतीही अनुचित घटना घडू नये म्हणून पोलीस प्रशासन सतर्क होते. बंद शांततेत पार पडला. नागरिकांनी सरकार आणि न्यायालयाकडे तातडीने दोषींना कठोर शिक्षा करण्याची मागणी केली आहे. तसेच, महिलांच्या व मुलींच्या सुरक्षेसाठी ठोस उपाययोजना करण्याचे आवाहन केले आहे. या घटनेमुळे समाजात असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. अशा घटना रोखण्यासाठी कायद्यांची कडक अंमलबजावणी आणि सामाजिक जागरूकता वाढवणे गरजेचे आहे.

### जिजाऊ महिला ब्रिगेड ची येवदा पोलीस स्टेशनवर धडक

येवदा पोलिस स्टेशन हद्दीत घडलेल्या माणुसकीला काळीमा फासणार्या घटनेचा जिजाऊ ब्रिगेड दर्यापूर तालुकाच्या वतीने तिव्र निषेध नोंदविण्यात आला. एका 65 वर्षीय नराधमाने 3 वर्षीय बालीकेवर अत्याचार केल्यामुळे सदर आरोपी वर पोक्सो अंतर्गत तीव्र गुन्हे दाखल करण्यात येवुन फाशीची शीक्षा देण्यात यावी,अशी मागणी करण्यात आली. जिजाऊ ब्रिगेड च्या वतीने येवदा पोलिस स्टेशन येथे ठाणेदार विवेक देशमुख व उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, दर्यापुर येथे निवेदन देण्यात आले. यावेळी ठाणेदारांनी तपास काळजीपुर्वक व जलद गतीने करू असे सांगीतले.तसेच पिडीतेच्या घरीही भेट देण्यात आली. यावेळी जिजाऊ ब्रिगेड च्या प्रदेश उपाध्यक्ष डॉ.अश्विनी देवके,जिल्हाध्यक्ष डॉ. अंजली जवंजाळ,मा.जि प सदस्या शिवानी अग्रवाल,वंदना करुले,महीला काँग्रेस तालुका अध्यक्ष जयश्री चव्हाण, जिजाऊ ब्रिगेड तालुका अध्यक्ष शिल्पा लोडम, ग्राम शाखा अध्यक्ष वसुधा देशमुख,डॉ.शुभांगी टोळे, डॉ. ज्योती हावरे, डॉ सुषमा देशमुख,अनीता सदाफळे तसेच डॉ. जयश्री पाटील,ज्योती बोबडे व असंख्य महीला उपस्थीत होत्या.यावेळी महीलांनी तिव्र स्वरूपाच्या भावना व्यक्त केल्या.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# शेतकऱ्यांची झुंज सुरुच, कधी संपणार हे दुष्टचक्र?

## शासन उदासीन, वेध कर्जमाफीचे



**विलास पाटील**

**वरूड,( दि.18 )** - दरवर्षी निसर्गात होत असलेला बदल, शासनाचे शेतीसंबंधी बदलत असलेले धोरण याचा परिणाम अनुकूल होण्या ऐवजी प्रतिकूल होत आहे. निसर्गाच्या बदलामुळे शेतकरीही बदलत असला तरी त्याच्यापुढे रोज एक नवे संकट उभे राहत आहे. प्रत्येक वर्ष नव्या बदलांचे संकट उभे करीत असल्याने निसर्गासोबत आणखी किती काळ झुंज द्यावी, असा प्रश्न शेतकर्यांना पडला आहे. या संकटाचे आव्हान स्विकारत शेतकरी रब्बीच्या पेरणीवर अवलंबून आहे. आधीच डबघाईस आलेला शेतकरी आता रब्बी पिकावर अवलंबून आहे. शासनाने निवडणुकीपुर्वी शेतकऱ्यांचे कर्ज माफीचे आश्वासन दिले होते, गारपीटग्रस्त, अतिवृष्टीग्रस्ताचे अनुदान अद्यापही आलेले नाही, त्यामुळे शेतकरी पुर्णतः खचुन गेलेला आहे.

आधुनिकतेपायी शेतीतंत्र बदलले. त्या बदलांचा परिणाम शेतीवर झाला. उत्पादन खर्च कमालीचा वाढला येणाऱ्या उत्पन्नातून मेळ बसविणे कठीण झाल्याने त्याचा परिणाम कुटुंबावर होऊ लागला आणि पुढे त्याच्या जीवनावर झाला आहे. निसर्गाच्या बदलामुळे शेतकऱ्यांना इतर पिकांचा शोध घ्यावा लागत आहे. अचलपूर, वरुड, मोर्शी, दर्यापूर, अंजनगांव, चांदूर बाजार, धारणी, चिखलदरा, इत्यादी तालुक्यात एकेकाळी जोमाने पिकणारी ज्वारी हद्दपार होण्याच्या मार्गावर आहे. वनांचा होत असलेला ऱ्हास व वन्यप्राण्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे चारा-पाण्यासाठी वन्यप्राणी शेतावर ताव मारत आहेत. शेतीअपिके सुरक्षित नाही, शेतकर्यांहना वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात बळी पडावे लागले आहे. त्यावर कुठलीही ठोस उपाययोजना शासनाकडे झालेली नाही.

शासनाच्या औद्योगिक धोरणामुळे शेतमजुर दिवसेंदिवस कमी होत आहे. निसर्गाचा लहरीपणा वाढतो आहे. शासनाचे शेतकऱ्यांप्रती उदासीन धोरण आहे. या प्रकारामुळे शेती आणि शेतकरी मोठ?ा संकटात गुंतत चालले आहे. निसर्गाचा लहरीपणा, जंगली प्राण्यांचा पिकात धूडगूस, शासनाची उदासिनता आदी संकटांचे आव्हान स्विकारत वरुड, मोर्शी, अचलपूर, दर्यापूर, चांदूर बाजार, अंजनगाव सुर्जी, धारणी, चिखलदरा या तालुक्यातील शेतकरी ज्याप्रमाणे चातक पक्षी ज्याप्रमाणे पाण्याची वाट पाहतो, त्याचप्रमाणे शेतकरी शासनाच्या अनुदानाची व कर्जमाफीची वाट बघत आहे.

> रासायनिक खतांमुळे पोत खराब होऊन जमीन नापीक होत आहे. शेतात शेणखत टाकल्यास जमिनीचा पोत सुधारतो. याचे महत्त्व शेतकऱ्याना पटल्याने तो शेणखतावर भर देतो. बहुतांशी शेतात शेणखताचे ढिगारे आहेत. शेणखत भरपूर प्रमाणात उपलब्ध व्हावे, शासनाने केलेल्या गोवंश हत्याबंदीच्या कायद्याचे हेही एक कारण आहे. आता महाराष्ट्रातील फडणवीस सरकारही कर्जमाफीबद्दल लवकरच निर्णय घेतील, यात दुमत नाही.
>
> **डॉ. महेंद्र राऊत, भाजप कार्यकर्ते.**

> शेतकऱ्याचं लेकरु म्हणून उमेदवाराला मतदान न करता फक्त शेतकरी हीच जात ठरवून शेतकरी हिताचा निर्णय घेणाऱ्यांना निवडून द्यायला हवे होते, परंतु भावनेत मत देवून आपण ज्या काही चुका केल्या असल्या तरी मात्र निवडुन आलेल्या उमेदवाराने याकडे लक्ष देणे गरजेचे आहे, मागील गारपिट व अतिवृष्टीग्रस्ताची नुकसान भरपाई अजूनपर्यंतही शेतकऱ्यांना मिळाली नाही, कर्जमाफीचा विषय कुठेही नाही त्याकडे लोकप्रतिनिधीने लक्ष देण्याची गरज आहे.
>
> **सुशिल बेले, अध्यक्ष, आक्रोश जनशक्ती संघटना.**

# धारणी पंचायत समिती चॅम्पियन ऑफ चॅम्पियन

## प्राथमिक, माध्यमिक व सांस्कृतिक विभागात दबदबा



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.18 )**- जिल्हास्तरीय प्राथमिक शालेय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवात धारणी पंचायत समितीने आपली परंपरा कायम राखली. प्राथमिक, माध्यमिकसह जनरल चॅम्पियनचा मान धारणी पंचायत समितीला मिळाला. तर, सांस्कृतिक कार्यक्रमात धामणगाव रेल्वे तर निदर्शनामध्ये तिवसा पंचायत समिती अव्वल ठरली.

श्री शिवाजी शारीरिक महाविद्यालयाच्या प्रांगणात तीन दिवसीय जिल्हा स्तरीय शालेय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचा आज (दि. 16) समारोप झाला. तर शिक्षण विभाग, जिल्हा परिषद अमरावतीतर्फे या शालेय क्रीडा महोत्सवाचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवाचा पारितोषिक वितरण सोहळा जिल्हा परिषदेचे प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी डॉ.अरविंद मोहरे यांच्या हस्ते झाला.

बक्षीस वितरण व समारोपीय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षणाधिकारी डॉ.अरविंद मोहरे हे होते. व्यासपिठावर माध्यमिक उपशिक्षणाधिकारी निखिल मानकर,अनिल कोल्हे, प्राथमिक उपशिक्षणाधिकारी बुद्धभूषण सोनोने अमरावतीचे धनंजय वानखडे, भातकुलीचे दीपक कोकतरे,चांदूर बाजारचे गटशिक्षणाधिकारी वकार अहमद, चिखलदराचे रामेश्वर माळवे, तिवसाचे डॉ.नितीन उंडे, चांदुर रेल्वेचे संदीप बोडखे,नांदगाव खंडेश्वरच्या कल्पना ठाकरे, वरूडचे विनोद गाढे, अंजनगावचे श्री.भ. गीरासे, मोर्शीचे गुणवंत वरघट, दर्यापूरचर संतोष घुगे, धामणगाव रेल्वेच्या सपना भोगावकर, धारणीचे सुनील खडे, अचलपूर येथील राम चौधरी, क्रीडा संयोजक प्रवीण खांडेकर, शिक्षण विस्तार अधिकारी गंगाधर मोहने, संगीता सोनोने, मोहम्मद अशफाक व आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्तविक क्रीडा संयोजक व शिक्षण विस्तार अधिकारी प्रवीण खांडेकर यांनी केले. तर संचालन सुनीता लहाने,अजय अडिकने व मनीष काळे यांनी केले.आभार उपशिक्षणाधिकारी बुद्धभूषण सोनोने यांनी मानले.

प्राथमिक विभागात कबड्डी मुले मध्ये नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील लोहगाव शाळा विजयी ठरली तर धारणी तालुक्यातील उकुपाटी शाळा उपविजयी झाली. कबड्डी मुलीमध्ये उकुपाटी, धारणी विजयी झाली तर चिखलदरा तालुक्यातील आडनद शाळा उपविजयी झाली. लंगडी मध्ये चिखलदरा तालुक्यातील केली शाळा विजयी तर धारणी तालुक्यातील खाऱ्या शाळा उपविजयी ठरली.

### मेळघाटच्या मोनिकाचा सन्मान



मेळघाटमधील धारणी तालुक्यातील उकुपाटी येथील जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळेतील मोनिका मनसाराम मोरेकर हीची राज्य स्तरावर कबड्डी स्पर्धेसाठी नामांकन झाले आहे. मार्गदर्शक शिक्षक महादेव राठोड,जयराम धूर्वे,राजेश वानखडे, मिठाराम कस्तुरे,रवींद्र मालवीय व आदी आहेत.या यशाबद्दल मोनिकाचे प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी डॉ.अरविंद मोहरे यांनी सत्कार केला.

# 5001 भक्तांनी केले एकत्रित सामूहिक परायण

## पी.आर.पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप चे आयोजन

## 'गण गण गणात बोते' मंत्रोच्चारांनी परिसर भक्तीमय



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.18 )** - मकरसंक्रांती, नवीन वर्ष आणि जागतिक पारायण दिनाचे औचित्य साधून दिनांक 17 जानेवारी 2025 रोजी पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप, अमरावती येथील स्वामी विवेकानंद ऑडिटोरियममध्ये श्री संत गजानन महाराज विजय ग्रंथ पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. श्रींच्या पालखीने सोहळ्याची सुरुवात झाली. पालखी व श्रींचे पूजन संस्थेचे अध्यक्ष आ.प्रवीण पोटे पाटील, अनुराधा प्रवीण पोटे, उपाध्यक्ष श्रेयस पोटे यांच्या हस्ते करण्यात आले.

अमरावती शहरासह जिल्हातील सुमारे 5000 पेक्षा जास्त गजानन महाराज भक्तांनी व महाविद्यालयातील विदयार्थ्यांनी या पारायण सोहळ्यामध्ये सहभाग घेतला.

मुखोदगत वाचक विद्या पडवळ (मुंबई) यांनी सुमधुर वाणीतून महाराजांना पारायण करीता आवाहन व त्यानंतर गजानन विजय ग्रंथ परायणाला सुरवात करण्यात आले. प्रत्येक अध्यायानंतर विद्या पडवळ यांनी गजानन महाराजांच्या अनुभवकथनाद्वारे प्रत्येक अध्यायानंतर उपस्थित भक्तांना भावनिक अनुभव दिला. पारायणाच्या सुरुवातीला सर्व भक्तांना गजानन विजय ग्रंथ प्रदान करण्यात आले, तसेच पारायणादरम्यान नाश्ता, चहा आणि पाण्याची व्यवस्था आयोजकांनी सेवेकऱ्यांमार्फत सुयोग्यरीत्या केली. श्री संत गजानन महाराज विजय ग्रंथ पारायण सोहळ्यात एकवीस अध्यायांच्या वाचनानंतर भक्तिमय वातावरणात उपासनेची सांगता करण्यात आली. महाराजांच्या आरतीसह मंत्रपुष्पांजली, बावन्नी, अष्टक आणि एकवीस नमस्कारांचे सामूहिक पठण करण्यात आले. पारायण सोहळ्यानंतर उपस्थित सर्व भक्तांसाठी महाप्रसादाचे भव्य आयोजन करण्यात आले होते. संपूर्ण सोहळ्यादरम्यान भक्तांनी अपार श्रद्धा व भक्तीभावाने सहभाग घेतला. उपासनेच्या प्रत्येक घटकाला भक्तांनी मोठ्या भावपूर्णतेने प्रतिसाद दिला.

# जि.प.शाळेच्या सुवर्ण महोत्सव निमित्त गावातून प्रभात फेरी

## गटशिक्षणाधिकारी विनोद गाढे यांची उपस्थिती






**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,( दि.18 )** - येथून जवळच असलेल्या बेनोडा शहीद येथील जिल्हा परिषद शाळेला 150 वर्षे पूर्ण झाल्याने त्या शाळेचा सुवर्ण महोत्सव म्हणून गावातून प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले. त्याचबरोबर प्लास्टिक बंदी व जिल्हा परिषद शाळेविषयी जनजागृती यावेळी करण्यात आली. या प्रभात फेरीला पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी विनोद गाढे यांनी भेट देऊन शुभेच्छा दिल्या.

पालकांचा कल हा इंग्रजी शाळेकडे वळल्याने जिल्हा परिषद शाळेविषयी पालकांमध्ये अनास्था पहायला मिळते. हा कल कुठेतरी बदलला गेला पाहिजे म्हणून जिल्हा परिषद शाळेविषयी जनजागृती निर्माण करण्याची वेळ ही शाळेतील कर्मचाऱ्यावर आली आहे. इंग्रजी शाळेच्या तुलनेत जिल्हा परिषदेच्या शाळा आजही दर्जेदार शाळा आहे. या शाळेमध्ये प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची निवड केल्या जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण हे जिल्हा परिषद शाळेतूनच मिळू शकते. त्यामुळे पालकांनी अशा प्रशिक्षित असलेल्या जिल्हा परिषदेच्या शाळेमध्येच मुलांना घालावं जेणेकरून मुलांची प्रगती झाल्याशिवाय राहणार नाही असे मत गटशिक्षणाधिकारी विनोद गाढे यांनी याप्रसंगी व्यक्त केले. यावेळी शाळेच्या विद्यार्थ्यांनी विविध महापुरुषांचे वेशभूषा केली होती यामध्ये महात्मा गांधी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर संत गाडगेबाबा अशा अनेक महापुरुषांचे वेशभूषित या जिल्हा परिषदेचे मुले दिसत होती. सरपंच रजनी कुबडे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुनील पुंड, विलास महाजन, गोपाल नांदुरकर, विशाल यावले, संदीप उईके तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका पुसे, महिला शिक्षक मानकर, बिजवे, वाडेकर, ठाकरे, निकम, शिक्षक पुसदेकर, प्रशिक्षक राज पापडकर सह गावातील नागरिकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

# आयटीआयमध्ये राष्ट्रीय युवा दिन साजरा



**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी, ( दि.18 )** - श्री गोविंद प्रभू शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था मोर्शी येथे दिनांक 12 जानेवारी 2025 रोजी स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे प्राचार्य कमलकिशोर फुटाणे तर प्रमुख उपस्थिती म्हणून संस्था व्यवस्थापन समिती सदस्य आर.बी. डहाणे, एम.जी. गव्हाळे, ए.जी. पडघम आणि संस्थेचे गट निदेशक एस. ए. अंभोरे उपस्थित होते.

प्रशिक्षणार्थांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी वकृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा यासारख्या विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रम दोन सत्रामध्ये पडला.

पहिल्या सत्रामध्ये निमंत्रित प्रमुख मार्गदर्शक ग्रामगीताचार्य तथा सामाजिक कार्यकर्त्या डॉ.प्रतिभा घाटोळ उपस्थित होत्या. त्यांनी आपल्या भाषणामध्ये जीवन जगत असताना महान विभूती स्वामी विवेकानंद आणि राजमाता जिजाऊ यांचे आदर्श व विचार आत्मसात करण्याविषयी मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमाची थीम 'उद्योजक प्रेरणा कार्यक्रम' अशी असल्यामुळे संस्थेतून उत्तीर्ण होऊन उद्योजक म्हणून कार्यरत असलेल्या माजी प्रशिक्षणार्थ्यांना सन्मानचिन्हे आणि प्रमाणपत्र देऊन गुणगौरव करण्यात आला. तर दुसऱ्या सत्रामध्ये निमंत्रित प्रमुख मार्गदर्शक डॉ. हेमंत सोनारे, उद्योजक तथा सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. त्यांनी प्रशिक्षणार्थ्यांना बदलत्या काळानुसार उद्योजक म्हणून काम करताना प्रशिक्षणाच्या अंगी कोणकोणते गुण असायला पाहिजे ते आपल्या मार्गदर्शनातून समजून सांगितले. तसेच संस्थेचे प्राचार्य कमलकिशोर फुटाणे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये युवकांचा देश अशी ओळख असलेल्या आपल्या राष्ट्रांच्या निर्माणात युवकांची भूमिका याविषयी महत्व पटवून दिले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शुभांगी देशमुख, उद्धव मोरे यांनी केले. तर प्रास्ताविक मनोहर गुल्हाने, जयकुमार भालेराव यांनी केले. तसेच आभार प्रदर्शन अमित बोडखे यांनी केले. सदर कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजना करीता संस्थेतील सर्व कर्मचारी वृंद यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाकरिता मोठ्या संख्येने प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

# अंजनगाव बारीतील शाळा समुह केंद्र धुळखात

## शिक्षण विभागाचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर



**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव बारी,( दि.18 )** - जिल्हा परिषदेकडून लाखो रुपयांचा निधी खर्च करून अंजनगाव बारी येथील कोंडेश्वर मार्गावर शाळा समुह सधन केंद्राचे बांधकाम केले. मात्र गेल्या 20 वर्षापासुन ही समुह सदन केंद्र शोभेची वस्तू बनून धुळखात पडली आहे. आतापर्यंत एकाही केंद्रप्रमुखाने या केंद्राचा उपयोग केला नसुन मुख्यालयी न राहण्याची जणू शपथच घेतली असल्याचे समजते.

विद्यमान केंद्रप्रमुखांचे तर दर्शनही न झाल्याने ते येतात कधी व जातात कधी हे कुणालाही ठाऊक नसते. ते त्यांचे शैक्षणिक काम, हजेरी व शाळांवर लक्ष ठेवण्याची जबाबदारी शिक्षकांवर टाकून मोकळे होत असल्याची माहिती आहे. एकंदरीत केंद्रप्रमुखाच्या गैरहजेरीमुळे दुर्लक्ष होत आहे. याकडे शिक्षण विस्तार अधिकारी यांचे दुर्लक्ष होत असुन शाळेला भेटी न देताच मोकळे होतात.

शासनाने नुकतेच या समुह केंद्राची दुरुस्ती, दोन शाळा, एक कार्यालयाची डागडुजी व रंगरंगोटी केली. मात्र हे समुह केंद्र वापरात नसल्यामुळे हा निधी वाया गेल्याचे दिसत आहे. तसेच शिक्षण विभागात साहित्य खरेदी मध्ये भ्रष्टाचार झाल्याची माहिती आहे. ज्यामध्ये पंचायत समितीच्या बड्या अधिकाऱ्यांचा समावेश असल्याचीही चर्चा केली जात आहे. जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी लक्ष घालून संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

### वनरक्षक व शिक्षक कधी राहणार मुख्यालयी!

अंजनगाव बारी वनक्षेत्रातील वनरक्षक मुख्यालयी हेडक्कार्टरला राहत नसल्याने शेतकऱ्यांसह नागरीकांना गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. पीक नुकसान संबंधी तक्रार करायची असल्यास शेतकऱ्यांनी कोठे जावे, याची दखल वरीष्ठ अधिकाऱ्यांनी घेण्याची मागणी नागरिकांनी केली आहे. जि.प.मुलांच्या शाळेतील मुख्याध्यापक सोडून इतर शिक्षक मुख्यालयी न राहता चार किलोमीटर अंतरापेक्षा जास्त अंतरावरून ये-जा करतात. यामध्ये ग्रा.पं.ने त्यांना मुख्यालयी राहण्यासाठी दाखले दिले कसे हेही औत्सुक्याचे ठरते. ते अवेळी येऊन कधी येतात व कधी जातात यावर कुणाचेही लक्ष नसते. यामध्ये विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असुन संबंधित अधिकाऱ्यांनी या शिक्षकांच्या येण्या-जाण्याची वेळ तपासून त्यावर योग्य ती कारवाई करण्याची मागणी पालवर्गाकडून होत आहे.

# बहिरम यात्रेत रंगणार बैलगाडा शर्यतीचा धुराळा

## 21 ते 23 जानेवारीला प्रहारच्या वतीने जंगी शंकरपट | दुचाकी वाहनांसह लाखोंच्या बक्षिसांची होणार उधळण




**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार,( दि.18 )** - विदर्भातील सर्वात जास्त काळ चालणारी ऐतिहासिक व पुरातन असलेल्या बहिरम बाबा यात्रा महोत्सवात 21 ते 23 जानेवारी दरम्यान प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने जंगी शंकरपटाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रहारच्या शंकरपटाची पंचक्रोशीतील नागरिक आतुरतेने वाट बघत असतात. यावर्षी विजेत्या स्पर्धकांना दुचाकी वाहनांसह लाखो रुपयांची बक्षिसे देण्यात येणार आहे. बच्चू कडू यांच्या संकल्पनेतील हे आयोजन असून मागील वीस वर्षांपासून निरंतर हे आयोजन सुरू आहे.

21 जानेवारी रोजी या जंगी शंकरपटाचे उदघाटन असून माजी आ. राजकुमार पटेल, उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव, शल्यचिकित्सक डॉ.प्रभुजी जवंजाळ, चांदुर बाजार येथील तहसीलदार रामदास शेळके, ठाणेदार महेंद्र गवई, गटविकास अधिकारी नारायण आमझरे यांच्या प्रमुख उपस्थितीत या शंकरपटाचे उदघाटन होणार आहे. वीस वर्षांपासून निरंतर बच्चू कडू या यशस्वी शंकरपटाचे आयोजन करत असून विदर्भात या शंकरपटाचा नावलौकिक आहे. दूरवरून या शंकरपटात स्पर्धक सहभागी होतात हे विशेष.

दोन गटात होणाऱ्या या शंकरपटाच्या स्पर्धकांना दुचाकी वाहने व लाखोंची बक्षिसे देण्यात येणार आहेत.23 जानेवारी रोजी अमरावती मध्यवर्ती सहकारी बँकेचे उपाध्यक्ष अभिजीत ढेपे,संचालक नरेशचंद्र ठाकरे, जयप्रकाश पटेल, सुनिल वऱ्हाडे, अजय मेहकरे, आनंद काळे, चित्रा प्रशांत डाहाणे यांच्या प्रमुख उपस्थितीत बक्षीस वितरण सोहळा पार पडणार आहे. तरी या जंगी शंकरपटात सहभागी होण्याचे आवाहन प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक बच्चू कडू यांनी केले आहे.

### शंकरपट ही बच्चू कडू यांची संकल्पना

श्री क्षेत्र बहिरम बाबा यात्रा महोत्सवाला अतिशय पुरातन आणि ऐतिहासिक वारसा लाभला आहे. मात्र काही वर्षांपूर्वी तमाशाची परंपरा या यात्रेत लाभली होती. तमाशामुळे अनेकांचे कुटुंब उघड्यावर आले, अनेकांचे संसार मोडले मात्र ही परंपरा मोडकळीस आणायचे काम वीस वर्षांपूर्वी बच्चू कडू यांनी केले.तमाशा बंद करण्यासाठी बच्चू कडू यांनी जेव्हा पुढाकार घेतला तेव्हा येथील व्यापारी वर्ग त्यांच्या व्यवसायाला घेऊन चिंतेत होते मात्र बच्चू कडू यांनी म्हटले होते की तमाशा बंद झाला तर दुप्पट व्यवसाय होईल.आणि त्यानंतर या यात्रेचे महत्व आणखी वाढत गेले. बच्चू कडू यांनी यात्रा महोत्सव दरम्यान याठिकाणी शंकरपट, शासन आपल्या दारी योजना, असे अनेक उपक्रम याठिकाणी राबवले. विशेष म्हणजे महिला वर्ग या यात्रेपासून लांब होत्या परंतु तमाशा बंद झाल्यानंतर महिला वर्ग आपल्या कुटुंबासह याठिकानी येत असल्याने या यात्रेमध्ये गर्दीने उच्चांक गाठला आहे.

### शहीद शेतकरी दुतोंडे यांच्या स्मृती प्रित्यार्थ सभागृह

इंग्रज काळी या ठिकाणी शेतकरी नेते दादासाहेब हावरे यांच्या नेतृत्वाखाली ऐतिहासिक असे कापूस आंदोलन झाले होते. त्यावेळी इंग्रज यांनी शेतकरी यांच्या वर गोळीबार केला. त्या दरम्यान शेतकरी विठ्ठलराव दूतोंडे शहिद झाले होते.त्यांच्या स्मृती प्रित्यार्थ सभागृह आणि स्मारक बच्चू कडू यांनी या ठिकाणी बांधले आहे.

# विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासातून समाजाचा विकास- आमदार गजानन लवटे



**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्जी, ( दि.18 )**- शाळेमधून विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणासोबत त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास करण्याचा प्रयत्न केला तर ते विद्यार्थी पुढे भावी जीवनामध्ये सक्षम नागरिक बनू शकतात. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकासामधून समाजाचा विकास होईल असे उद्गार आमदार गजानन भाऊ लवटे यांनी स्थानिक ग्रीन हार्ट स्कूलच्या स्नेहसंमेलनात उद्घाटन प्रसंगी काढले.

दि.12 जानेवारी 2025 रोजी अंजनगाव सुर्जी येथे राष्ट्रमाता जिजाऊ स्वामी विवेकानंद जयंती व ॲड भाऊसाहेब बारबदे स्मृतिदिनानिमित्त स्नेहसंमेलन आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. भैय्यासाहेब मेटकर कार्यकारी सभासद संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, उद्घाटक व प्रमुख अतिथी म्हणून दर्यापूर विधानसभा क्षेत्राचे आमदार गजानन लवटे होते. प्रमुख उपस्थितीमध्ये माजी प्राचार्य आयटीआय विवेक पडोळे,. माजी पोलीस उपअधीक्षक शेखरराव कडू, गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती बी.आर. गिरासे, केंद्रप्रमुख पंचायत समिती मनोज बारबदे, प्रा.सीमा मेटकर, मेघा पडोळे , ज्योती कडू , महेंद्र दिपटे, मिलिंद निचळ , प्राचार्य गजाननराव चोपडे , अनिल चोपडे संस्थेच्या प्राचार्य शमा चोपडे, पर्यवेक्षक रूपाली खडसे, प्रगती लोळे यांच्यासह आदि मान्यवर उपस्थित होते.

प्रास्ताविक भाषणामध्ये प्राचार्य क्षमा चोपडे यांनी वसुधा अभ्युदय फाउंडेशन संस्थेची व ग्रीन हार्ट स्कूल ची व्याख्या विषद केली. शाळेच्या अभ्यासक्रमासोबत इतर राबवित असणाऱ्या कला, क्रीडा, सांस्कृतिक, विज्ञान प्रदर्शनी इत्यादी उपक्रमांची माहिती दिली. शाळेच्या वर्ग दहावीच्या सतत 100 टक्के निकालाची उज्वल परंपरा कायम असल्याचे सांगितले. डॉ. भैय्यासाहेब मेटकर यांनी अध्यक्ष भाषणामध्ये शाळेच्या शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांमधून गाडगेबाबांना अभिप्रेत करून करणारा समाज निर्माण होईल असे भावपूर्ण उदगार काढले. स्नेहसंमेलनाच्या सांस्कृतिक कार्यक्रमांमधून विद्यार्थिनी नृत्य, गीत फॅशन शो, नाटिका, एकपात्री प्रयोग इत्यादी सादरीकरण केले. कुमारी रेणुका कोल्हे या विद्यार्थिनीने मी सावित्री बोलते हा एकपात्री प्रयोग प्रेक्षकांची मने जिंकून गेला. कार्यक्रमाचे संचालन मोहिनी काळमेघ व आभार प्रदर्शन पल्लवी धुमाळे यांनी केले. कार्यक्रमाचे यशस्वीते करता ग्रीन हार्ट स्कूलच्या सर्व शिक्षकांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमास पालक व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.